# 'इको फेस' सोशल साईटची निर्मिती

**❑ संभाजीनगरच्या तरुणांची कामगिरी**

**❑ फेसबुक, ट्विटरला पर्याय**

संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी)- इंटरनेट जगात सोशल नेटवर्किंगचा धुमाकूळ सुरू आहे. फेसबुक ट्विटरसारख्या साईटमध्ये सामान्यजन गुंतले आहेत. नेमका हाच धागा धरत पर्यावरणाच्या क्रांतीसाठी इको नीड्स फाऊंडेशनच्या वतीने शिवाजी खंडागळे व प्रा. प्रियानंद आगळे यांनी इको फेस ही सोशल नेटवर्किंग वेबसाईट तयार केली आहे. इको फेसमुळे पर्यावरण बचावासाठी नक्कीच फायदा होणार असून, एक क्रांतिकारी पाऊल ठरणार असल्याची माहिती इको नीड्स फाऊंडेशनचे उपाध्यक्ष रोहित थोरात यांनी दिली.

त्यांनी पुढे सांगितले की, इको फेसच्या माध्यमातून इको निड्स फाऊंडेशन पर्यावरणाच्या समस्यांना वाचा फोडणार आहे. सर्वांनाच पर्यावरणासाठी काम करावेसे वाटते. पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याचे सर्वांनाच दिसते. त्यामुळे भविष्यात निर्माण होणाऱ्या संकटांची जाण सर्वांनाच आहे. परंतु एकटा माणूस, एकटी संस्था यासाठी तोकडी पडते. म्हणूनच पर्यावरणाचे प्रश्न व संवर्धनासाठी इको फेसची निर्मिती करण्यात आली आहे. या सोशल नेटवर्किंग साईटचा उगम केवळ पर्यावरणाचे संवर्धन यासाठी झाले आहे. या साईटशी जुळणारा प्रत्येक जण पर्यावरण बचावासाठीच्या कल्पना जगासमोर मांडू शकतो. त्यावर चर्चा करू शकतो. माहितीचे आदान-प्रदान करू शकतो फेसबुक, ट्विटरपेक्षा जास्त फंक्शन यामध्ये असून, पर्यावरणाशिवाय इतर माहिती यामध्ये टाकता येणार नाही. इको फेसच्या माध्यमाने प्रदूषणाचे फोटो, व्हिडिओ, वेब लिंक, डाक्युमेंटस, ॲक्टिव्हिटी, पोस्ट करता येणार आहे.

फोरम कळमुळे पर्यावरणाच्या एखाद्या प्रश्नावर विचार मांडण्यासाठी करण्यात आला आहे. याचे उदाहरण म्हणजेच हिंदुस्थानचे नदी धोरण, डर्बन परिषद, लवासा प्रकल्पाला पर्यावरणाची मान्यता हवी की नाही आदी होय.

इको निड्स फाऊंडेशनने बायडायव्हर्सिटी प्रदूषण, इको रिव्होल्युशन, पर्यावरण संशोधक यासारखे ग्रुप आधीच बनवून साईटच्या मुखपृष्ठावर ठेवण्यात आले आहे. या ग्रुपच्या माध्यमाने जैव विविधतेविषयी माहिती लोड करता येते. इको फेसचा उपयोग शालेय विद्यार्थ्यांना नक्कीच होणार आहे. त्याचप्रमाणे पर्यावरण बचावासाठी संशोधन करणाऱ्या व्यक्तींशी थेट संवाद साधता येणार आहे.

इको फेस जॉईन करण्यासाठी www.ecoface.in टाईप करावे लागणार आहे. पर्यावरण बचावासाठी हिंदुस्थानी तरुणांनी ही साईट बनवली असून, हे एक क्रांतिकारक पाऊलच ठरणार आहे. प्रत्येक पर्यावरण मित्राने या सोशल साईटचा वापर करावा, असे आवाहन इको निड्स फाऊंडेशनच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आले.